# Washim District Police

**Nature of Work** :- **Recovery of Stolen Property**

**Police Station** :- **Dhanaj**

**Date of Good Work done** :- **10/06/2022**

**Brief of the work done :-**

पो.स्टे. धनज - अवैधरित्या विनापरवाना स्टील/लोखंडी सळ्या विक्री करणाऱ्यास पोलिसांनी केले जेरबंद ; अंदाजे 60 टन मुद्देमाल जप्त.

लोकमत

# अवैधरित्या स्टील विक्री, पोलिसांनी केले ६० टन स्टील जप्त



लोकमत न्यूज नेटवर्क

**धनज** : येथून जवळ असलेल्या दोनद बु येथे वाशिम जिल्हा पोलिस अधीक्षक यांच्या चमूने अवैधरित्या स्टील विक्री करणाऱ्या धाब्यावर धाड टाकून ४० लाख रुपयांच्या जवळपास किंमत असलेले ६० टनच्यावर स्टील ताब्यात घेतले आहे.

८ जून रोजी सायंकाळी वेळेस धनज पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या दोनद बु. येथे हांडे पॉईट अँड धाबा येथे अवैधरित्या स्टील (लोखंडी गज) विकल्या जात असल्याची गुप्त माहिती वाशिम पोलीसांना मिळाली. त्यानुसार त्यांनी सदर घटना स्थळावर धाड टाकून पाहणी केली असता मोठ्या प्रमाणात अवैधरित्या स्टील आढळून आले. एपीआय भरत लसंते यांनी दिलेल्या माहितीनुसार , शामु रामानंद शर्मा, बद्रेआलम अब्दुल सय्यद व गजानन बाबाराव हांडे या तीन आरोपींकडून अवैधरित्या स्टीलची विक्री केली जाते. तसेच बनावट कागदपत्रे व जीएसटी बिल बनवून ग्राहकांना विकल्या जाते. या गुन्ह्यातील आरोपीविरुद्ध भादविच्या कलम ४६३ व ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास कारंजा ग्रामीण पोलीस करीत आहे. २००८ मध्येही अशीच कारवाई केली होती.